जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 NOV 2024
लोकमत



शहाजी लॉ कॉलेजमध्ये मूल्यांकन करताना नॅक पिअर टीम.

# शहाजी लॉ कॉलेजला 'ए प्लस' मानांकन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या येथील शहाजी लॉ कॉलेजला राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद बंगळुरू यांच्याकडून ए प्लस मानांकन मिळाले आहे. शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात ३.४१ सीजीपीएससह 'ए प्लस हे मानांकन मिळवणारे हे पहिलेच लॉ कॉलेज आहे.

महाविद्यालयातील अभ्यासक्रम, अध्ययन, अध्यापन व मूल्यमापन, संशोधन, उपक्रम व विस्तार, भौतिक सुविधा आणि संसाधने, विद्यार्थी सुविधा व प्रगती, प्रशासन, नेतृत्व व व्यवस्थापन, संस्थात्मक मूल्ये व सामाजिक उत्तरदायित्व या निकषांवर महाविद्यालयाची सर्वांगीण तपासणी नॅक समितीने केली. ऑनलाइन व ऑफलाइन या दोन्ही पद्धतीने झालेल्या मूल्यांकनामध्ये नॅक कडून 'ए प्लस' श्रेणी प्रदान केली. नॅक मूल्यांकनासाठी अध्यक्षा रजनीताई मगदूम, डॉ. प्रसाद मगदूम, डॉ. विश्वनाथ मगदूम, अ‍ॅड. वैभव पेडणेकर, अमित बाडकर,डॉ. प्रवीण पाटील, डॉ. सुजाता शानबाग यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. (वा.प्र.)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 NOV 2024
लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचा १८ नोव्हेंबरला वर्धापनदिन कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा



६२वा वर्धापनदिन येत्या १८ नोव्हेंबरला होणार असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी, तर प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित असतील. वर्धापनदिनानिमित्त गुणवंत शिक्षक, सेवक, महाविद्यालयांमधील गुणवंत प्राचार्य, शिक्षक, शिक्षक व प्रशासकीय सेवकांची गुणवंत पाल्य यांचा सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी बॅ. पी. जी. पाटील आर्दश शिक्षक व प्राचार्या सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा गौरव होईल. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम होईल. १८ नोव्हेंबरला सकाळी ८:३० वाजता ध्वजवंदन व ८:४५ ला वर्धापनदिन समारंभाला सुरुवात होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 NOV 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा १८ ला वर्धापन दिन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा वर्धापन दिन सोमवार, दि. १८ रोजी राजर्षी शाहू सभागृह येथे सकाळी ८.३० वाजता साजरा करण्यात येणार आहे. कार्यक्रमास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

वर्धापन दिन कार्यक्रमात विद्यापीठातील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, संलग्न महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य, शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय सेवक यांची शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेली पाल्ये, बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्य सुमतीताई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा गौरव केला जाणार आहे.

0 8 NOV 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या वर्धापन दिनास कुलगुरू डॉ. गोसावी प्रमुख पाहुणे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा वर्धापन दिन दि. १८ रोजी साजरा करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास सावित्रीबाई फुले-पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी प्रमुख पाहुणे असणार आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आहेत. प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. वर्धापनदिनी विविध सत्कार समारंभ पार पडणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 NOV 2024
सकाळ

# विद्यापीठाच्या वर्धापनदिनासाठी कुलगुरू सुरेश गोसावी प्रमुख पाहुणे



डॉ. गोसावी

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा वर्धापन दिन १८ नोव्हेंबरला होणार आहे. त्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. ते भौतिकशास्त्र आणि पर्यावरणशास्त्राचे अभ्यासकही आहेत.

विद्यापीठात वर्धापनदिनी सकाळी साडेआठ वाजता ध्वजवंदन आणि त्यानंतर राजर्षी शाहू सभागृहात वर्धापनदिनाचा कार्यक्रम होईल. त्यात विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, संलग्न महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य, शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठामधील शिक्षक व प्रशासकीय सेवकांची शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेली पाल्ये, बॅरिस्टर पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्या सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा गौरव, प्रशासकीय गुणवत्ता अभियान पुरस्काराचे वितरण आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आज दिली.

0 8 NOV 2024 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा तैवानच्या विद्यापीठाशी सामंजस्य करार

कोल्हापूर, ता. ७ : नॅशनल डाँग विद्यापीठाचे शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभागाशी उत्तम शैक्षणिक व संशोधकीय सहकार्य प्रस्थापित झाले आहे. नव्या सामंजस्य करारामुळे शिवाजी विद्यापीठाच्या इतर अधिविभागांशीही सहकार्यवृद्धी होईल, अशी अपेक्षा तैवान येथील नॅशनल डाँग विद्यापीठाच्या विज्ञान व अभियांत्रिकी विद्याशाखेच्या उपअधिष्ठाता प्रा. श्रीमती य्यु-यी चँग यांनी आज येथे व्यक्त केली.

तैवानचे नॅशनल डाँग विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या दरम्यान आज सामंजस्य करार झाला. त्यावेळी प्रा. चँग बोलत होत्या.

## शैक्षणिक सुविधा, उपकरणांची पाहणी

■ तैवानच्या शिष्टमंडळाने सामंजस्य करारानंतर विद्यापीठातील काही निवडक अधिविभागांना भेटी देऊन तेथील शैक्षणिक व संशोधकीय सुविधा, आधुनिक शास्त्रीय उपकरणांची पाहणी केली. विविध अधिविभागांतील विद्यार्थी, संशोधक विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी त्यांच्यासमवेत पदार्थविज्ञान विभागाचे प्रा. चिन-चिह ली, वँग-ची येह मटेरियल सायन्स विभागाचे प्रा. यी-चिआ चेन, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'या कराराअंतर्गत आता उभय विद्यापीठांतील जैविक विज्ञान व रासायनिक विज्ञानाच्या विभागांमध्येही संशोधकीय बंध निर्माण होतील. करारावर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तैवान विद्यापीठातर्फे प्रा. चँग यांनी स्वाक्षरी केल्या. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. सरिता ठकार, श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख, मेघा गुळवणी, कैलास सोनवणे, प्रवीणकुमार पाटील, राजीव व्हटकर, ज्योती जाधव, पंकज पवार, पवन गायकवाड, किरणकुमार शर्मा उपस्थित होते.' डॉ. शिवाजी सादळे यांनी स्वागत केले. डॉ. सुभाष माने यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सागर डेळेकर यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने गुरुवारी तैवान येथील नॅशनल डाँग हवा विद्यापीठासमवेत सामंजस्य करार केला. या कराराच्या प्रतीचे हस्तांतर करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि तैवान विद्यापीठाच्या उप-अधिष्ठाता प्रा. य्यु-यी चँग. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

जनसंपर्क कक्ष
08 NOV 2024
सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बाबा सावंत यांना अभिवादन

## विद्यापीठात रक्तदान शिबिरात ४० जणांचा सहभाग

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे संस्थापक सरचिटणीस आणि माजी अध्यक्ष प्रभाकर तथा बाबा सावंत यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त गुरुवारी त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी रक्तदान शिबिर घेण्यात आले.




**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे संस्थापक सरचिटणीस बाबा सावंत यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त गुरुवारी त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते.

सेवक संघाच्या कार्यालयात सकाळी दहा वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते सावंत यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, शासनाच्या विभागीय रक्त केंद्रातर्फे घेण्यात आलेल्या शिबिरात ४० जणांनी रक्तदान केले.

ज्येष्ठ पत्रकार आणि राजकीय विश्लेषक श्रीराम पवार, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, सुमित्रा खानविलकर, शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. नितीन सोनजे, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, वित्त व लेखाधिकारी सुहासिनी पाटील, उपकुलसचिव वैभव ढेरे, नीलेश बनसोडे, विलास सोयम, अभिजित रेडेकर, धैर्यशील यादव, आदींनी सावंत यांना अभिवादन केले.

यावेळी निशा सावंत, देवेंद्र आणि बंटी सावंत, विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले, उपाध्यक्ष संजय पोवार, राम तुपे, डॉ. राजेंद्र खामकर, निशिकांत पलंगे, अनिल पाटील, सदानंद माने, रमेश साळोखे, विलास सावंत, किशोर सासने, सुनील जाधव, आदी उपस्थित होते.

0 8 NOV 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या परीक्षा मंगळवारपासून

## हिवाळी सत्राचा प्रारंभ : विविध अभ्यासक्रमांचा समावेश

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षांचा प्रारंभ मंगळवार (ता. १२) पासून होणार आहे. पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या परीक्षा पहिल्या टप्प्यात सुरू होतील. पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षाच्या परीक्षा विद्यापीठाकडून घेतल्या जाणार आहेत.

ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने हिवाळी सत्रातील परीक्षा घेण्याचे नियोजन केले होते. मात्र, अभ्यासक्रम अपूर्ण असल्याने या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. त्यानुसार आता या परीक्षांचा प्रारंभ मंगळवारपासून होणार आहे. त्यात विविध दहा पी. जी. डिप्लोमा अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या परीक्षेसाठी विद्यापीठ कॅम्पसवरील सुमारे पाचशे विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या कामकाजासाठी विद्यापीठ आणि महाविद्यालयीन पातळीवरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती झाल्याने अधिक विद्यार्थी संख्या



असलेल्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा २६ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहेत. या परीक्षेसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील सुमारे एक लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

### परीक्षा अर्ज भरण्याची मुदत

■ विधी आणि शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे अर्ज भरण्याची मुदत परीक्षा मंडळाने वाढविली आहे. त्या विनाविलंब शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत १९ नोव्हेंबर, विलंब शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत २२ नोव्हेंबर, तर अतिविलंब शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत २५ नोव्हेंबरपर्यंत असल्याची माहिती डॉ. जाधव यांनी दिली.

“ या हिवाळी सत्रातील सर्व सत्र, वर्षाच्या परीक्षा विद्यापीठ घेणार आहे. त्याबाबतची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. भरारी पथक, परीक्षा घेण्याच्या नव्या मार्गदर्शक तत्त्वांची निश्चिती केली जाणार आहे.

**-डॉ. अजितसिंह जाधव,** संचालक, परीक्षा मंडळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 NOV 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा १८ नोव्हेंबरला वर्धापन दिन

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी प्रमुख पाहुणे

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा वर्धापण दिन सोमवार १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता ध्वजारोहणाने होणार आहे. सकाळी ८.४५ राजर्षी शाहू सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमाला वाजता प्रमुख पाहुणे म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी उपस्थित राहणार आहेत. तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहेत. तरी प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहक कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापणदिनी गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, संलग्न महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य, शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांची शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त पाल्य, बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्य सुमतीबाई पांडूरंग पाटील आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा गौरव, प्रशासकीय गुणवत्ता अभियान पुरस्कार देवून सन्मानित केले जाणार आहे. तरी प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहक विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.